1 आर.सी.सी. १२३/२०२०
सरकार वि. जनार्धन
निशाणी २१

<u>**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ३ याची जबानी**</u>
<u>**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**</u>

माझे नाव – बाळासाहेब उमाजी बांबळे, वय – ५० वर्षे,
व्यवसाय – नोकरी, राहणार – गुरवझाप,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

<u>**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**</u>

१. दिनांक २२.०४.२०२० रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी सुदर्शन लांडे यांच्या घरी श्रेया अपार्टमेंट येथे बोलावले होते. त्याचा फ्लॅट नंबर ३०१ असा होता. घटनास्थळाच्या पुर्वेस रस्ता, पश्चिमेला मोकळी जागा, दक्षिणेला कोल्हार–घोटी रोड व उत्तरेला मोकळी जागा आहे. मी घटनास्थळी गेलो त्यावेळी तेथे अर्धा पंचनामा लिहून झालेला होता. अर्धा पंचनामा माझ्या उपस्थितीत लिहीला. त्यावेळी वाघ पोलीसाने मला घराची माहीती लिहीली आहे असे सांगितले. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. पंचनाम्यातील घराचे वर्णन बरोबर आहे. बाकीच्या इतर मजकुराबाबत मला माहीती नाही. तो मजकूर माझ्या समक्ष लिहीलेला नव्हता. सहीस **निशाणी २२** देण्यात येते. घटनास्थळ पंचनाम्याच्या वेळेस फोटो काढले होते. पंचनामा करतेवेळी दुसरा पंच अभिजीत चौधरी हा होता. पंचनामा हा दुपारी ०४:३० च्या दरम्यान केला होता.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

२. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे सुदर्शन लांडे याने दाखवले होते. हे म्हणणे खरे आहे की, फ्लॅट नंबर ३०१ च्या समोर त्यांचया फ्लॅट नंबर ३०२ हा होता व तो त्यावेळी बंद होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर साक्षीदाराने सांगितले की, टाकीत पाणी पडत नाही या कारणावरून आरोपीला विचारणा केली असता त्याने त्याच्या आईवडीलांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा माझे समक्ष तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील संपुर्ण मजकूर हा पोलीसांनी माझे समक्ष लिहीला व त्यानंतर मी त्यावर वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. बी. व्ही. मोरे यांच्या मार्फत**

३. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यासाठी हजर राहण्याकरीता पोलीसांनी मला लेखी नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी श्रेया अपार्टमेंटच्या पाठीमागील बाजूस राहण्यास आहे त्यामुळे त्या अपार्टमेंटमध्ये कोण राहते याची मला माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या माहीतीच्या आधारे मी आजरोजी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझेसमक्ष कोणताही पंचनामा लिहीला नव्हता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की अर्धा लिहीला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा न वाचता त्यावर सही केली. पंचनाम्यामध्ये घराचा नंबर, चतु:सिमा व एरीयाचे नाव लिहीले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही त्यामुळे त्यात काय लिहीले हे मला सांगता येत नाही. हे

म्हणणे खरे नाही की, पंचनामा करतेवेळी मी, पोलीस व लांडे हे होते हे मी खोटे सांगत आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी हे माझे नातेवाईक असल्यामुळे माझे तेथे नेहमी जाणे–येणे असते त्यामुळे मला त्या फ्लॅटबाबत माहीती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.11.15 18:28:53 +0530

दिनांक १५.११.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले